प्रेसनोट दि.०४/०८/२०१८

---

**१) मोका केस मधील पाहीजे आरोपीस सामाजिक सुरक्षा विभागाकडील पथकाने छत्तीसगढ येथे केले जेरबंद**

येरवडा पो.स्टे. गु.र.नं.७५७/२०१७ भादवि क. ३७०, ३७०(अ) सह आय.टी.पी.ए कलम ३,४,५ महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii), ३(२),(३),(४) या गुन्हयाचा तपास सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे २,पुणे शहर यांचेकडे असुन दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी जॉन ऊर्फ जतीन चावडा रा. रायपुर, छत्तीसगढ याचा शोध सुरु होता. दरम्यान सामाजिक सुरक्षा विभागाकडील पोलीस कर्मचारी सतिष ढोले यांना मिळालेल्या बातमी प्रमाणे सामाजिक सुरक्षा विभागाच्या प्रभारी अधिकारी मनिषा झेंडे यांचे अधिपत्याखाली सपोनि अनिता खेडेकर, पो.हवा.गितांजली जाधव, नितीन तरटे, पोना.सतिश ढोले व रेवणसिध्द नरोटे या पथकाने रायपुर, छत्तीसगढ येथे जावुन सापळा लावुन नमूद आरोपीस ताब्यात घेतले आहे.

**२) डेक्कन पो.स्टे.कडील गुन्हयातील पाहीजे आरोपीस चोरी केलेले ऑटो रिक्षासह वाहन चोरी विरोधी पथकाने केले जेरबंद.**

डेक्कन पो.स्टे. गु.र.नं.१३६/२०१८ भादविक. ३९२ या गुन्हयाचा तपास चालु होता दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी अविनाश सुरेश बोधे रा.५३०, कसबा पेठ, पुणे हा डेक्कन येथे येणार असलेबाबत वाहन चोरी विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी येलपले यांना बातमी मिळाली. त्याप्रमाणे वाहन चोरी विरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी दिपक लगड यांचे अधिपत्याखाली पो.हवा.तुपे, नाळे, कदम, पोना. शिर्के व घोरपडे या पथकाने शिरोळे रोड, डेक्कन येथे जावुन सापळा लावुन नमूद आरोपीस चोरीस गेले १,८०,००० किं चे ऑटो रिक्षासह ताब्यात घेतले आहे.

**३) एकुण २ लॅपटॉप व १६ मोबाईल असा एकुण अंदाजे १,७४,०००/- किं. च्या मुद्देमालासह आरोपीस युनिट ४ कडुन अटक.**

भोसरी पो.स्टे. गु.र.नं.१७/२०१८ भादविक. ३८० या गुन्हयातील चोरीस गेले मोबाईल व लॅपटॉपचा समांतर तपास करता, इसम नामे संजय बाबुराव देशमुख वय ३२ वर्ष, रा.भोसरी, पुणे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करुन त्याचे ताब्यातुन २ लॅपटॉप व १६ मोबाईल असा १,७४,०००/- किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी युनिट ४ चे प्रभारी अधिकारी ब्रंम्हानंद नायकोडी यांचे अधिपत्याखाली सपोनि दिपाली मरळे, सपोनि गणेश पाटील, पोहवा महादेव धनगर, कैलास बोबडे, प्रमोद लांडे, पोना अमित गायकवाड, हेमंत खरात, पोशि सुनिल चौधरी या पथकाने कामगिरी केली आहे.

**४) वेगवेगळया १३ गुन्हयात पाहीजे असलेला कुख्यात गुंड प्रमोद उर्फ गणेश गजरे यास युनिट ५ कडुन दोन देशी बनावटीचे पिस्तुलांसह अटक.**

युनिट ५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ता चव्हाण यांचे पथकातील सपो.निरी,तासगांवकर, सपो.निरी,ढवळे, सपोफौ.शिंदे, पो.हवा.संतोष मोहिते. प्रदीप सुर्वे, प्रविण शिंदे, राजेश रणसिंग, केरबा गलांडे, अमजद पठाण, सचिन घोलप, पो.ना. महेश वाघमारे, प्रविण काळभोर, प्रमोद गायकवाड,गणेश बाजारे, प्रमोद घाडगे, अंकुश जोगदंडे, चापोशि. ९१३६ दळवी यांनी स्थानिक गुंड प्रमोद उर्फ गणेश गजरे, वय २७, रा.हडपसर यास २ देशी बनावटीचे पिस्टल, २ काडतूस व १ दुचाकीसह असा एकूण कि.रु. १,९४,०००/- च्या मुद्देमालासह अटक केली असून तो वेगवेगळया १३ गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**५) मोबाईल चोरी करणाऱ्या गुन्हेगारास सं.गु.वि.पथकाने अटक करुन त्याचेकडून एकूण ०४ गुन्हयामधील किं.रु. १,०९,९९०/- चे ०९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले.**

घाई व गर्दीमध्ये बस पकडणाऱ्या महिला प्रवाश्यांना हेरुन त्यांच्या पर्समधून मोबाईल चोरणारा आरोपी संदेश दिपक गंगावणे, वय २१, रा. सांगवी, पुणे यास पोहवा शेलार यांचे बातमीवरुन पो.नि. बागवान व त्यांचे पथकातील कर्मचारी यांचे पथकाने अटक करुन त्याचेकडून एकूण ०४ गुन्हयामधील किं.रु. १,०९,९९०/- चे ०९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

वरील सर्व कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री देशपांडे, मा. पोलीस उप-आयुक्त, आर्थिक व सायबर, श्री, सुधीर हिरेमठ आणि मा. पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२, श्री भानुप्रताप बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे.